# कृषिरत्न डॉ. विवेक क्षीरसागर यांच्याविषयी



गौतम कोतवाल

डॉ. विवेक क्षीरसागर १९८५ सालापासून पुण्यातील कात्रज डेअरीत कार्यरत आहेत. पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून ते कात्रज डेअरीत रुजू झाले. आज ते या डेअरीचे कार्यकारी संचालक आहेत. खरंतर डॉ. क्षीरसागर यांना माणसांचा डॉक्टर म्हणून करिअर घडवायचं होतं. परंतु, पात्रता असूनही त्यांना मेडिकलला प्रवेश मिळू शकला नाही. तेव्हा ते व्हेटर्नरीला गेले. कात्रज डेअरीने दूध उत्पादनाच्या क्षेत्रात आज जे स्वतंत्र स्थान मिळवलं आहे; त्याचं बरचसं श्रेय डॉ. क्षीरसागर यांच्याकडे जातं. त्यांचा कात्रज डेअरी सोबतचा आजपर्यंतचा प्रवास पाहिला तर ही बाब आपल्या सहज लक्षात येईल.

साखर कारखानदारी आणि दुग्ध व्यवसाय हे प्रामुख्याने सहकारी तत्त्वावर चालणारे शेतकऱ्यांचे दोन प्रमुख उद्योग. सहकारी साखर कारखानदारीने ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्याचं काम केलं, तर सहकारी दुग्ध व्यवसायाने शेतकऱ्यांचा खिसा कायमचा खुळखुळता ठेवला. त्यामुळे जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय हा शेतकऱ्यांसाठी अतिमहत्त्वाचा ठरला. याचं सारं श्रेय जातं ते राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड, आणंदचे अध्यक्ष व दूध महापूर योजनेचे जनक डॉ. वर्गीस कुरियन यांच्याकडे. गुजरातमधील 'आणंद'च्या माध्यमातून डॉ. वर्गीस कुरियन यांनी देशात श्वेतक्रांती घडवून आणली. तोच आदर्श समोर ठेवत महाराष्ट्र सरकारने 'दूध महापूर योजना' राबवून राज्यात धवलक्रांती घडवून आणली. त्यातून ठिकठिकाणी सहकारी दूध उत्पादक संस्था उभ्या राहिल्या. त्यांचे 'सहकारी जिल्हा दूध संघ' निर्माण झाले. शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या दुधाला खात्रीशीर बाजारपेठ तर मिळालीच पण चांगला




हमीभावही मिळाला. त्यातून शेतकऱ्यांच्या खिशात पैसे खुळखुळू लागले. शेतकरी आणि ग्राहक या दोघांचेही हीत जपत काही दूधसंघ काम करत आहेत. त्यातलं आघाडीचं नाव म्हणजे 'कात्रज डेअरी' हे होय. पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचा 'कात्रज' हा ब्रँड आहे. याच ब्रँडनेमच्या आधाराने लोकांचा विश्वास संपादन करत या डेअरीने सभासद, शेतकरी, ग्राहक आणि कर्मचारी अशा सर्वांचं हीत जपत दुग्ध व्यवसायात नवी भरारी घेतली आहे. एकेकाळी १२ कोटी रुपयांचा वार्षिक तोटा सहन करणाऱ्या या डेअरीने टप्प्या-टप्प्याने सुधारणा घडवून आणत १६५ कोटींच्या वार्षिक उलाढालीची मजल गाठली आहे. पुणे जिल्ह्यात शासकीय, सहकारी तसेच खासगी असे दुधाचे ६५ प्रक्रिया प्लँट आहेत. या सर्वांची एकत्रित क्षमता एक कोटी लिटर्सहून अधिक आहे. परंतु, पुणे जिल्ह्यात होणारं दुधाचं एकूण उत्पादन १५ लाख लिटर्स इतकंही नाही. त्यामुळे दूध मिळवण्यासाठीची स्पर्धा किती जीवघेणी असेल याचा अंदाज न केलेलाच बरा. सुरुवातीच्या काळात कात्रज डेअरीने दुधाचं संकलन एक लाख लिटर्स वरून चार लाख लिटर्सपर्यंत वाढवलं होतं. आज ते पुन्हा दीड लाख लिटर्सपर्यंत खाली घसरलं आहे; पण म्हणून उत्पन्नाच्या पातळीवर कुठलीही घट झाली नाही; कारण कात्रज डेअरीने दुधाबरोबरच दुग्धजन्य पदार्थही बाजारात आणले. त्याला ग्राहकांनीही चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे दुधाचं संकलन कमी झालं असलं तरी संघाच्या उत्पन्नात घट झाली नाही. त्यामुळेच दुग्ध व्यवसाय अनेक

संकटांशी सामना करत असताना देखील कात्रज डेअरी मात्र भक्कमपणे आपल्या पायावर उभी आहे.

सहकारी दुग्ध व्यवसाय हा सहकारी दूध संघांच्या कामगिरीवर अवलंबून आहे. संघाची कामगिरी चांगली असेल, तर दूध उत्पादक शेतकरी या जोडधंद्यात टिकून राहतो. आणि उत्पादक शेतकरी टिकून राहिला, तरच संघाला आपला व्यवसाय वाढवता येतो. पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाच्या आजवरच्या माननीय संचालकांनी ही बाब नेमकेपणानं हेरली. त्यातूनच कात्रज डेअरीला आपलं स्वतःचं स्थान निर्माण करता आलं आहे. अर्थात, आधी म्हटल्याप्रमाणे याचं बरचसं श्रेय कात्रज डेअरीचे सध्याचे कार्यकारी संचालक डॉ. विवेक क्षीरसागर यांच्याकडे जातं. डॉ. क्षीरसागर याविषयी सांगतात, 'दुग्ध व्यवसायात डॉ. कुरियन यांनी ज्या काही महत्त्वाच्या गोष्टी आणल्या त्यापैकीच सहकारी दूध संघाचे 'पशुवैद्यकीय अधिकारी' ही एक आहे. दुधाचं गुणवत्तेसह उत्पादन वाढवणं हे दूध व्यवसायाच्या वाढीसाठी आवश्यक आहे. त्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांना जनावरांची काळजी घेण्यासंबंधी योग्य मार्गदर्शन मिळणं गरजेचं होतं. ही गरज दूध संघांनी पशुवैद्यकीय अधिकारी नेमून पूर्ण करावी अशी सूचना त्यांनी केली होती. त्यातून दूध संघाकडून असे अधिकारी नेमले जाऊ लागले. त्यातून मला कात्रज डेअरीत काम करण्याची संधी मिळाली. त्याचं श्रेय मी डॉ. वर्गीस कुरियन यांना देईन.'

आजही दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या जनावरांची नेमकी काय काळजी घ्यावी याची पुरेशी माहिती नाही. त्याचा परिणाम दुधाचं उत्पादन आणि त्याचा दर्जा यावर होतो. या दोन्ही गोष्टींमध्ये सुधारणा झाल्या, तर निश्चितच त्याचा फायदा शेतकऱ्यांना अधिक होऊ शकेल. हाच दृष्टिकोन ठेवून डॉ.विवेक क्षीरसागर यांनी कात्रज डेअरीत कामाला सुरुवात केली.

डॉ. क्षीरसागर पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू होण्यापूर्वी संघामार्फत कसलीही पशुवैद्यकीय सेवा दूध उत्पादकांना पुरवली जात नव्हती. डॉ. क्षीरसागर यांनी कामाला सुरुवात केल्यानंतर चार महिन्यात पुणे जिल्हा दूध संघाचा फिरता दवाखाना सुरू झाला. १९८७ मध्ये इंदापूरचा बावडा विभाग शिवामृत दूध संघातून बाहेर पडून पुणे जिल्हा दूध संघात सामील झाल्यानंतर कृत्रिम रेतनाची सेवा कात्रज डेअरीमार्फत सुरू करण्यात आली. त्याला शेतकऱ्यांकडून अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर पुढच्या काही महिन्यातच जिल्ह्यामध्ये ७०-८० ठिकाणी कृत्रिम रेतन सेवा केंद्र सुरू करण्यात आली. त्यातून वर्षाला १० ते १२ हजार कालवडी तयार

होऊ लागल्या. त्याचा परिणाम म्हणून दूध संकलनात मोठी वाढ झाली. १९८५ मध्ये एक लाख लिटर्स दूध जमा करणंही संघाला अवघड जात होतं. परंतु कृत्रिम रेतन सेवा सुरू केल्यानंतर संघाकडे १९९८-९९ पर्यंत चार लाख लिटर दूध जमा होऊ लागलं.

पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. विवेक क्षीरसागर यांनी केलेल्या कामाचं हे फळ होतं. अर्थात, एवढ्या मोठ्या प्रमाणात जमा होणाऱ्या दुधाच्या वितरणाची व्यवस्था संघाला त्या काळात करता आली नाही. त्यामुळे वर्षातून ३०-३५ वेळा दूध संकलन बंद ठेवावं लागे. अशा वेळी उत्पादित दुधाची योग्य ती विल्हेवाट लावणं दूध उत्पादक शेतकऱ्यांनाही  जमायचं नाही. त्यामुळे अनेकदा शिल्लक दूध रस्त्यावर, ओढ्यात किंवा गोबरगॅसमध्ये ओतून द्यावं लागे. डॉ. क्षीरसागर सांगतात, 'अशा बंद काळात जेव्हा शेतकरी आपल्याकडचं दूध असं ओतून देत तेव्हा माझ्या मनाला वेदना होत. एक पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून आपलं काम संपलं आहे याची जाणीव करून देणारीच ही घटना होती; कारण दूध संकलन बंद करण्याची वेळ वारंवार येऊ लागल्यानंतर कृत्रिम रेतनाचा कार्यक्रम थांबवा अशा सूचना वरिष्ठांकडून माझ्याकडे येऊ लागल्या होत्या.'

या सूचनाच डॉ. विवेक क्षीरसागर यांच्यासाठी 'टर्निंग पॉईंट' ठरल्या. कृत्रिम रेतनाचा कार्यक्रम एकट्या कात्रज डेअरीने थांबवला, तरी इतरत्र अनेक पशुवैद्यकीय अधिकारी तो आपापल्या पातळीवर राबवत होते. त्यामुळे त्यातून नवीन कालवडींची पैदास वाढत होती, त्यावर कसलंच नियंत्रण नव्हतं. त्यामुळे निर्माण होणाऱ्या कालवडींच्या दर्जाचाही प्रश्न त्यातून पुढे येत होता. एकंदरीतच दुग्ध व्यवसायात काही नवी संकटं येऊ घातली होती. त्यावर योग्य वेळी योग्य ते उपाय शोधले नाहीत, तर हा व्यवसाय मोठ्या अडचणीत सापडू शकतो अशी ती स्थिती होती. डॉ. विवेक क्षीरसागर यांनी या स्थितीचा आपल्या कामाशी काही एक संबंध नसताना गांभीर्याने अभ्यास केला. या अभ्यासातून त्यांना दुधाच्या मार्केटिंगमध्ये काही बदल करण्याची गरज जाणवली. ती त्यांनी प्रशासनाकडे व्यक्त केली. इतकंच नाही, तर त्यांनी मार्केटिंगचीही जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दाखवली. एक पशुवैद्यकीय अधिकारी आपल्या अधिकारात न येणाऱ्या गोष्टींचा विचार करतो आणि त्यात काही सुधारणा घडवून आणण्यासाठी पडेल ती जबाबदारी उचलण्याची तयारीही दाखवतो हे सहज घडत नाही. एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन जेव्हा माणूस काम करू लागतो तेव्हाच

हे घडतं.

डॉ. क्षीरसागर यांच्या म्हणण्यानुसार शासकीय, खासगी आणि सहकारी या तीन क्षेत्रांचा विचार केला, तर आजही आपल्याला सहकारातली पारदर्शकता दिसून येते. ती शासकीय आणि खासगी क्षेत्रात उरलेली नाही. सहकारातही काही गोष्टी खटकणाऱ्या आहेत. तरीही सहकारातून शेतीचा आणि शेतकऱ्यांचा विकास सहज साध्य करता येऊ शकतो. त्यासाठी गरज आहे ती प्रामाणिकपणे काम करण्याची. विचाराचा हाच धागा पकडून डॉ. क्षीरसागर कात्रज डेअरीत मार्केटिंगची जबाबदारी स्वीकारतात आणि नवनव्या पद्धतीचा अवलंब करत शेतकऱ्यांच्या या डेअरीला एका उंचीवर नेऊन ठेवण्यासाठी धडपडतात.

जास्तीच्या दुधाचं करायचं काय, असा प्रश्न निर्माण होऊ लागल्यामुळे शेतकऱ्याचं दूध वारंवार नाकारलं जाऊ लागलं. त्यामुळे अनेक शेतकरी दूध धंद्यापासून दूर जाऊ लागले. त्याचा परिणाम पुढे दूध संकलनावर होऊ लागला. दुधाचं संकलन घसरू लागल्याने कोणाचंही दूध नाकारायचं नाही अशी भूमिका शासनाने घेतली. त्यामुळे पुन्हा एकदा संघासमोर पेच निर्माण झाला. यातून मार्ग काढण्यासाठी कात्रज डेअरीने आपली वितरण व्यवस्था बदलली. म्हणजे दुधाचं वितरण खासगी डिस्ट्रीब्यूटरकडे सोपवलं. तोपर्यंत दुधाचं वितरण कर्मचाऱ्यांमार्फत केलं जात होतं. हा बदल केल्यामुळे वितरण व्यवस्थेतले कर्मचारी रिकामटेकडे बनले. त्यांच्यासाठी काही कामच उरलं नाही. या जास्तीच्या कर्मचाऱ्यांना सांभाळणं संघाला परवडणारं नव्हतं. तेव्हा संघाने कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छानिवृत्ती योजना जाहीर केली. त्यातून एकाच वेळेस ३४२ कर्मचाऱ्यांनी निवृत्ती स्वीकारली. त्यात कर्मचारी आणि संघ दोघांचाही फायदा झाला.

दरम्यानच्या काळात एका चिलींग सेंटरवर 'कात्रज' या ब्रँड नेमने तुपाची विक्री सुरू केली. त्याला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यातून दही, लस्सी, ताक, सुगंधी दूध, क्रीम, श्रीखंड, आम्रखंड अशा काही दुग्धजन्य पदार्थांचं उत्पादन सुरू केलं. ग्रामीण भागात त्याची काही पार्लर्स सुरू केली. मग शहरी भागातही अशी पार्लर्स सुरू केली. आज या पार्लर्समधून होणाऱ्या विविध पदार्थांच्या विक्रीतून संघाला वर्षाकाठी २० कोटी रुपये मिळतात. केवळ कात्रज डेअरीच्या तीन पार्लर्समधून होणारी रोजची विक्री चार ते पाच लाखांच्या घरात पोचली आहे. आता कात्रज डेअरी तर्फे खवा, पेढा आणि आईस्क्रीम अशा दोन पदार्थांचंही उत्पादन सुरू केलं



असून, तेही ग्राहकांच्या पसंतीला उतरले आहे. एक प्रशासकीय अधिकारी म्हणून या साऱ्या धडपडीत डॉ. क्षीरसागर यांचा वाटा मोठा आहे. तो लक्षात घेऊनच २००४ साली त्यांची संघाचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. एक पशुवैद्यकीय अधिकारी सहकारी चळवळ आणि सहकारी दुग्ध व्यवसाय या विषयीच्या तळमळीतून थेट कार्यकारी संचालक बनतो ही छोटी गोष्ट नाही.

या प्रवासात डॉ. क्षीरसागर यांना आपली आर्थिक उन्नती फारशी करता आलेली नसेलही, पण सर्वसामान्य शेतकऱ्यांचा तसेच संघात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आर्थिक स्तर उंचवण्यात चांगला हातभार लावता आला. त्यामुळे आज ते समाधानी आहेत. कदाचित म्हणूनच माणसांचा डॉक्टर होता आलं नाही याचं दुःख आज डॉ. क्षीरसागर यांना फारसं होत नाही.

कार्यकारी संचालक म्हणून संघाची जबाबदारी स्वीकारल्यानंतरही डॉ. क्षीरसागर यांनी सर्व संचालक आणि चेअरमन यांच्या मदतीने कात्रज डेअरीचा आणि पर्यायाने सभासद शेतकऱ्यांचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणावर केला.

शासनाकडून अनुदानापोटी मिळालेल्या १२ लाख रुपयातून डेअरीसाठी स्टेनलेस स्टीलचे कॅन खरेदी केले. शासनाकडून येणं असलेल्या ९० लाख रुपयात ओतूरचं चिलींग सेंटर शासनाकडून ताब्यात घेतलं. त्यामुळे कात्रज डेअरीची प्रक्रिया क्षमता वाढली. त्यानंतर डेअरीची जुनी झालेली मशिनरी बदलली आणि कार्यक्षमता वाढवत कामकाजात शिस्त आणली. त्याचबरोबर एगमार्क एच.ए.सी.सी.पी., आय.एस.ओ. ९००१:२००८, एफ.पी.ओ. आदी प्रमाणपत्रे मिळवली. कात्रज डेअरीच्या मुख्यालयाच्या आवारात संस्थेचे चेअरमन कै. मामासाहेब मोहोळ यांचा पुतळा उभारला. शेतकऱ्यांना मार्गदर्शन व्हावं म्हणून 'कात्रज डेअरी एक्स्पो', 'कॅटल शो' हे दोन महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू केले. शासनाकडून कात्रज डेअरीच्या २० एकर जागेपैकी १५ एकर जागा नांवावर करून घेऊन उर्वरित पाच एकरांचा दावा सध्या उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. डेअरी आज फायद्यात असून त्याचा लाभ सर्वांनाच होत आहे. शेतकऱ्यांना वेगवेगळ्या सवलती व अधिक भाव, दरफरक तर कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान, स्वेच्छानिवृत्ती योजनेच्या माध्यमातून खूप मोठा भार हलका केला असला तरी अद्यापही ६०० कर्मचारी संघात काम करत आहेत. त्यांची कुटुंबे आज कात्रज डेअरीवर अवलंबून आहेत. त्यामुळे त्यांच्या कल्याणाच्याही अनेक योजना संघातर्फे राबवण्यात आल्या आहेत. या सर्व अंतर्गत सुधारणा घडवून आणत असतानाच दूध उत्पादक 'शेतकरी आणि ग्राहक यांचंही समाधान होईल अशी सेवा उपलब्ध करून देणं ही तारेवरची कसरतही डॉ. क्षीरसागर सर्व संचालक मंडळाच्या मदतीने लीलया करत आहेत.

कात्रज डेअरीच्या माध्यमातून सहकाराच्या क्षेत्रात दूधउत्पादक शेतकऱ्यांच्या आणि डेअरीतील कामगारांच्या हिताचा विचार करणाऱ्या डॉ. विवेक क्षीरसागर यांचं सामाजिक भान जागृत आहे. शहर आणि खेड्यामध्ये रुंदावत असलेली दरी, वाढती बेरोजगारी, वाढते प्रदूषण, वाढता चंगळवाद आधुनिकतेच्या नावाखाली तयार झालेल्या चुकीच्या समजुती, आपल्या सुसंस्कृतीचा पडत चाललेला विसर आदी गोष्टी डॉ. क्षीरसागर यांना अस्वस्थ करतात. गरिबी आणि विषमतेच्या दुष्टचक्रातून समाज कसा मुक्त होऊ शकेल. यावर त्यांचं चिंतन सुरू असतं. ते वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने या पुस्तकात मांडलं आहे. वाचक या पुस्तकाचं स्वागत करतील याची खात्री आहे.



भविष्यात त्यांना पुणे जिल्हा दूध उत्पादक संघ सक्षमपणे उभा राहिलेला पाहायचा आहे. त्यासाठी ग्राहकांना उत्तम सेवा पुरवणं आणि शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देत हा व्यवसाय वृद्धिंगत करणं हे ध्येय त्यांनी समोर ठेवलं आहे. त्यासाठी मूलभूत स्वरूपाचं काही काम उभं करण्याचा त्यांचा मानस आहे. ते म्हणतात, 'ऊस उत्पादन आणि साखर उद्योगाच्या वाढीसाठी 'वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट' ही संस्था ज्या पद्धतीने काम करत आहे, त्याच पद्धतीनं दुग्ध व्यवसायाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणारी 'शरद पवार डेअरी इन्स्टिट्यूट'नावाची संस्था स्थापन करण्याचा माझा मानस आहे. आपल्याकडे आज दुधाचे अनेक ब्रँड आहेत. त्याचा फटका शेतकरी आणि ग्राहक अशा दोघांनाही बसतो. गुजरातमध्ये 'गुजरात को-ऑप. मिल्क मार्केटिंग फेडरेशन' या संस्थेच्या माध्यमातून राज्यभरात एकाच ब्रँडनेमने दूध आणि दुग्धजन्य पदार्थ विकले जातात. म्हणजे संपूर्ण भारतात 'अमूल' हा एकच ब्रँड आपल्याला बघायला मिळतो. तशा पद्धतीने आपल्या राज्यातही 'महाराष्ट्र मिल्क मार्केटिंग बोर्ड' ही संकल्पना राबवावी लागेल. त्या दृष्टीनेही माझे प्रयत्न सुरू आहेत.' या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर खासगी, सहकारी आणि शासकीय प्रतिनिधी नियुक्त करून त्याला संविधानिक दर्जा देत दुधाचे विपणन करण्याचाही त्यांचा मानस आहे.

**गौतम कोतवाल**